Court

N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फार्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** पिंपरी-चिंचवड **P.S.(ठाणे):** दिघी
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0267 **Year (वर्ष):** 2026
**Date and Time of FIR (प्र. ख. दिंनाक आणि वेळ):**09/06/2026 06:19

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** दरमियानी दिन
**Time Period (कालावधी):**
**Date From (दिंनाक पासून):** 04/06/2026
**Date To ( दिंनाक पर्यंत):** 08/06/2026
**Time From (वेळेपासून):** 15:34 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 15:13 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिंनाक ):** 09/06/2026 **Time (वेळ):** 06:19 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 015
**Date & Time (दिंनाक आणि वेळ):** 09/06/2026 06:19 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
उत्तर, 6 किमी **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** चहोली बुद्रुक ताहवेली जि पुण, येथील ग्राम महसुल अधिकारी,कार्यालय तलाठी कार्यालय

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**



Scanned with CamScanner

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** शैलजा शशिंकात शिंदे

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1990

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | लाचलुचपत प्रतिबधक विभाग,पुणे,दिघी,पिंपरी-चिंचवड,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | लाचलुचपत प्रतिबधक विभाग,पुणे,दिघी,पिंपरी-चिंचवड,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-7722011255

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | आलोसे श्री सुनिल भिकाजी सातोसे | | | 1. रा फलट नं 1307, बीविंग,13 वा मजला, आयट्रेंड लाइफ , सोसायटी, वाकड पुणे,दिघी, पिंपरी-चिंचवड,महाराष्ट्र,भारत |
| 2 | नेमाजी माधवराव भोकरे | | | 1. सर्वे नं550, माऊली निवास, काकडे सिटी, चहोली खुर्द रोड, , मुळ पत्ता, मु बेलापुर पोस्ट , ता अर्धापुर, जिल्हा नांदेड,दिघी, पिंपरी-चिंचवड,महाराष्ट्र,भारत |



Scanned with CamScanner

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-) (चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

11. **Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्यादी जबाब दि. 09/06/2026.

मी श्रीमती शैलजा शशिंकात शिंदे, वय- 39 वर्षे, व्यवसाय –नोकरी, पोलीस निरीक्षक, नेमणूक- लाचलुचपत प्रतिंबधक विभाग, पुणे रा.ठी. ए 102, विंडसर पार्क, माऊली चौक, दत्तमंदीर रोड, वाकड, पुणे 411057 मो. 7722011255.

आज रोजी समक्ष हजर राहून फिंयाद देते की, आम्ही दि. 01/06/2026 रोजी 12.30 वा. आमचे ला.प्र. वि. पुणे कार्यालयात,हजर असताना पोलीस उप अधीक्षक श्री दयानंद गावडे यांनी आम्हाला त्यांचे कक्षात बोलावून सदर ठिकाणी हजर असलेले तक्रारदार श्री. तेजस सोपान बुर्डे, वय-30 वर्षे, काम – शेती, रा. मु.पो.च-होली बु. तालुका हवेली , जिल्हा पुणे यांचे सोबत ओळख करुन देऊन त्यांची लाचेची तक्रार आहे. आपण पुढील कारवाई करावी अशी सूचना केली. तसेच सदर कारवाई कामी मदती करीता पोकॉ/9843 महामुलकर, पो.शि.भुषण ठाकुर व चालक पो.शि./4337 कदम यांचे ताब्यातील शासकिय वाहन महिंद्रा टि यु व्ही गाडी क्र. एम एच 12 आर. वाय. 7271 असे मदतीकरीता घेण्यास सांगीतले. तसेच सदर कारवाईसाठी थोडया वेळात पुणे महानगरपालिकेचे दोन पंच उपलब्ध करुन देतो असे कळविले. त्यानंतर आम्ही तक्रारदार यांना आमचे कक्षामध्ये घेवुन गेलो. तेथे त्यांना त्यांचे पुर्ण नांव विचारले असता त्यांनी त्यांचे नाव श्री. तेजस सोपान बुर्डे, वय-30 वर्षे, काम – शेती, रा. मु.पो.च-होली बु. तालुका हवेली , जिल्हा पुणे असे सांगितले. त्यानंतर तक्रारदार यांचेशी आम्ही त्यांचे तक्रारीबाबत चर्चा केली असता तक्रारदार यांनी तलाठी ऑफीस, च-होली बु◌ु, ता. हवेली, जि. पुणे येथील तलाठी (ग्राम महसुल अधिकरी) श्री सुनिल भिकाजी सातुसे यांचेविरुद्ध लाचेची तक्रार असल्याचे सांगीतले व त्यांची तक्रार त्यांचे स्वहस्ताक्षरात लिहुन दिली ती पुढीलप्रमाणे.

“उपरोक्त विषयान्वये मी अर्जदार श्री.तेजस सोपान

ब्◌ा◌ु

ड

◌े, वय- 38 वर्षे, काम शेती, रा ठि सर्वे न 170, मुक्ताई निवास, बुर्डे वस्ती, चरवली बु. ता हवेली जि पुणे या ठिकाणी माझे माझे आजोबा नामे पांडुरंग महादु बुर्डे यांची चरोली बु येथे सर्वे नं 37/2, 173/5, 185/2, 186/1, 187/5, 190/2 अशी वडीलोपार्जित शेतजमिन आहे. माझे आजोबा पांडुरंग बुर्डे यांचे दिंनाक 15/05/2024 रोजी वृद्धपकाळाने निधन झाले. त्यानंतर सदर शेतजमिनीवर माझे वडील नामे सोपान पांडुरंग बुर्डे व माझे काका नामे सुनिल पांडुरंग बुर्डे यांची वारसनोंद घेण्याकरीता डिसेंबर 2025 मध्ये मी तलाठी कार्यालय, चरोली बुद्रुक येथे गेलो असता, तेथील तलाठी नामे सुनिल भिकाजी सातुसे यांनी मला लेखी अर्ज व महाईसेवा केंद्राचे अ◌ॅफिडिव्हिट जोडण्यास सांगितले. त्याप्रमाणे मी त्याच दिवशी लेखी अर्ज व सोबत महा ई सेवा केंद्राचे अ◌ॅफिडिव्हीट जोडुन सदर अर्ज तलाठी सातुसे सर यांचेकडे दिला. परंतु त्यांनी मला त्याची पोहोच दिली नाही. त्यानंतर मी माझे वडील व काका यं◌ाचे वारसना◌ेंदीबाबत विचारणा करण्याकरीता वारंवार तलाठी कार्यालय, चरोली बु येथे जात होतो. परंतु तलाठी सातुसे हे अदयाप प्रकरण पाहिले नाही, असे सांगुन वारस नां◌ेद करण्यास जाणुनबुजुन उशीर करत होते.



Scanned with CamScanner

दिंनाक 29/05/2026 रोजी दुपारी 1:30 वाजण्याचे सुमारास तलाठी कार्यालय चरोली बु ता हवेली जि पुणे येथे जावुन तलाठी सातुसे सर यांना भेटलो असता, त्यांनी मी दिलेला वारसनोंदीचा अर्ज पाहिला असुन सदर नांेदी घेण्याकरीता सुरुवातीस 1 लाख 80 हजार रुपये दयावे लागतील असे सांगितले. परंतु मी फक्त शेती करतो, माझेजवळ एवढी रक्कम नसल्याचे त्यांना सांगितले, त्यावर त्यांनी तडजोेड करुन 80,000/- रुपये मागितले. त्यानंतर सदर रक्कम वारसनोंदीची शासकीय फी नसुन ती लाच रक्कम असल्याचे माझी खात्री झाली.

तलाठी श्री सुनिल भिकाजी सातुसे यांना मला लाचेची रक्कम देण्याची इच्छा नसल्याने आज दि. 01/06/2026 रोजी मी तलाठी कार्यालयात न जाता तक्रार देण्याकरीता लाचलुचपत प्रतिंबधक विभाग, पुणे येथे आलो आहे. माझे व तलाठी श्री सुनिल सातुसे यांचेत कोणतेही पुर्ववैमनस्य तसेच आर्थिक देवाण घेवाण किंवा उसणवारी नाही. तरी श्री सुनिल भिकाजी सातुसे, पद- तलाठी, नेमणुक- चरोली बु, ता हवेली, जि पुणे यांचेविरुद्ध कायदेशीर कारवाई होणेस, विंनती आहे." वगैरे मजकुरची तक्रार लिहुन दिली.

त्यानंतर 13:00 वाजताचे सुमारास दोन पंच आमचे कक्षात हजर झाले त्यांची नावे पंच श्री साहील बापुसाहेब प्रधान, वय 19 वर्षे, व्यवसाय-नोकरी, पद- शिपाई, मालमत्ता व्यवस्थापण विभाग, मनपा पुणे, रा. फलॅट नं.22 ऋतुगंध सोसायटी, टेल्को कॉलनी, जांभुळवाडी रोड, कात्रज पुणे. मो न 7391955633. व पंच श्रीकांत अनंत देशपांडे, वय 57 वर्षे, व्यवसाय नोकरी, पद- वरिष्ठ लिपीक, मुख्य अभिंयता प्रकल्प कार्यालय पुणे मनपा , रा.बी/3, भिकनशेठ काटे पार्क दापोडी पुणे. मो न 9850872670. अशी असुन सदर तक्रारीचे अनुषंगाने कारवाईकामी त्यांची नेमणुक केल्याचे त्यांनी सांगितले. त्यानंतर त्यांची व तक्रारदार व पंचाची ओळख करुन दिली व ओळख करुन घेतली. तक्रारदार यांनी पंचांना प्रथम तोंडी तक्रार कथन केली. व त्यानंतर त्यांचे स्वहस्ताक्षरात लिहुन दिलेली तक्रार एकच असल्याची खात्री करुन सदर तक्रारीवर पंचांनी व आम्ही समक्ष म्हणुन सही केली. लोकसेवक श्री सातुसे यंाचे दिंनाक 01/06/2026 रोजी पडताळणी करण्याचे सर्वानुमते ठरविले.

त्याप्रमाणे आम्ही तक्रारदार यांना जेलरोड येथील मेंटल हॉस्प्टिलचे पाठीमागील बाजुचे रोडलगत जाऊन थंाबण्याबाबत सुचना केली. त्यानंतर आम्ही सापळा पथक व पंचासह पडताळणी/सापळा कारवाईसाठी आवश्यक असणारे पिंटर, लॅपटॉप, अँथ्रसीन पावडर, काळा कपडा, स्टेशनरी साहित्य, अल्ट्रा व्हायोलेट दिवा, सिलींग लेबलींगचे साहित्य इ. साहित्य शासकीय वाहन महिंद्रा टियुव्ही गाडी क्र. एम एच 12 आर. वाय. 7271 मध्ये ठेवुन लाप्रवि कार्यालय येथुन 15:28 वा. रवाना झालो. त्यानंतर येरवडा - मेंटल हॉस्पिटल रोडच्या पाठीमागील बाजुच्या रोडलगत 15.54 वा. पोहचलो. सदर ठिकाणी तक्रारदार हे त्यांचेकडील काळ्या रंगाच्या चेतक गाडी क्र. एम एच 14 के एल 4646 सह हजर होते. त्यानंतर आम्ही तक्रारदार यांना आमचे शासकीय वाहनात घेवुन लाच मागणी पडताळणी कारवाईसाठी तक्रारदार व पंच यांना आमचे कडील व्हाईस रेकॉर्डर व व्हिडीओ कॅमेरा दाखवुन सदर व्हाईस रेकॉर्ड मध्ये 16 जीबी क्षमतेचे सॅनडीस्क कंपनीचे नवीन मेमरी कार्ड टाकले व व्हिडीओ कॅमे-यामध्ये 8 जीबी क्षमतेचे सॅन्डीस्क कंपनीचे नवीन मेमरीकार्ड टाकले. त्याचे वर्णन पंचनाम्यामध्ये नमुद करण्यात आले आहे. त्यानंतर 16/14 वाजता व्हाईस रेकॉर्डर व व्हिडीओ कॅमेरा सुरु करुन तक्रारदार श्री. तेजस बुर्डे, पंच क्र.1 श्री. साहील प्रधान , पंच क्र. 2 श्री श्रीकांत देशपंाडे यांची निवेदने ध्वनिमुद्रीत केली. त्यानंतर व्हिडीओ कॅमेरा व शासकीय व्हाईस रेकॉर्डर बंद करण्यात आला. ती वेळ 16:20 वाजताची होती.

त्यानंतर आम्ही तक्रारदार व पंच सापळा पथक यांना पडताळणी कारवाई विषयी आवश्यक सुचना दिल्या व तक्रारदार श्री बुर्डे यंाना व्हाईस रेकॉर्डर चालु करुन लावुन पडताळणीसाठी पंच क्र.1 श्री. प्रधान यांचेसोबत तक्रारदार यांचे दुचाकी चेतक गाडी क्र. एम एच 14 के एल 4646 यावरुन रवाना केले. ती वेळ 16.40 वा.ची होती. उर्वरित सापळा पथक व पंच क्र.2 हे जेलरोड येथील मेंटल हॉस्पिटलचे पाठीमागील बाजुचे रोडलगत थांबून राहिले. तक्रारदार व पंच क्र 1 हे आम्ही थांबलो होतो त्या ठिकाणी परत आले. त्यावेळी तक्रारदार यांचेकडील व्हाईस रेकॉर्डर काढून बंद केला त्यावेळी 17:23 वाजले होते. त्यानंतर आम्ही पंच क्र. 1 श्री. साहील प्रधान यांना गेल्यापासून येईपर्यंत काय झाले असे विचारले असता, त्यांनी सांगितले की, "मी व तक्रारदार असे त्यांचे दुचाकी वाहनावर तलाठी कार्यालय च-होली बु. येथे गेलो असता सदर ठिकाणी लोकसेवक हे तलाठी कार्यालय येथे हजर नव्हते. त्यामुळे तक्रारदार यांनी स्वत:चे मो.क्र. 7276203137 वरुन लोकसेवक श्री सातुसे यांना त्यांचे मो.क्र. 8390088073 यावर कॉल केला असता लोकसेवक यांनी फोनवर तक्रारदार यांना ते पंचनाम्याकरीता बाहेर गेले असुन उदया येऊन भेटा, असे सांगितले." त्यानंतर आम्ही तक्रारदार श्री. बुर्डे यांच्याकडे विचारणा केली असता त्यांनीही वरीलप्रमाणे हकीकत सांगितली. तसेच आम्ही व्हाईस रेकॉर्डर मधील संभाषण फास्ट फॉरवर्ड करुन ऐकले असता तक्रारदार व लोकसेवक यांचेमध्ये प्रलंबीत काम व लाचेच्या रक्कमेबाबत कोणतेही संभाषण झाले नसुन लोकसेवक यांनी तक्रारदार यंाना उदया दिनाक 02/04/2026 रोजी भेटण्याकरीता बोलविल्याचे ध्वनिमुद्रणामध्ये निष्पन्न झाले. त्याबाबत झालेले संभाषण सविस्तर पंचनाम्यामध्ये नमुद करण्यात आले आहे." सदर



Scanned with CamScanner

दिवशी सापळा कारवाई तात्पुरती स्थगीत करण्यात आली.

त्यानंतर दिंनाक 02/06/2026 रोजी तक्रारदार यांनी आम्हाला फोनद्वारे माहिती दिली की, लोकसेवक श्री सातुसे हे आज रोजी कार्यालयात नाहीत त्यामुळे त्यांची भेट होणार नाही. त्यामुळे दिंनाक 02/06/2026 रोजीची पडताळणी कारवाई तात्पुरती स्थगित करण्यात आली. तसेच पुढील पडताळणी कारावाई हि दिंनाक 03/06/2026 रोजी संपर्क करुन करण्याचे ठरविण्यात आले.

दिंनाक 03/06/2026 रोजीच्या पडताळणी कारवाई करण्याकरीता तक्रारदार श्री तेजस बुर्डे यांना पंच क्र.1 श्री साहील प्रधान यांचेसह तलाठी कार्यालय च-होली बु. येथे पाठविण्यात आले. त्यावेळी लोकसेवक हे त्यांचे कार्यालयात हजर नव्हते त्यामुळे तक्रारदार यांनी कार्यालयातील इतर लोकसेवक यांना लोकसेवक यांचेबाबत विचारणा केली त्यावेळी ते पंचनाम्याकरीता बाहेर गेले असल्याचे त्यांना समजले. त्यानंतर तक्रारदार श्री बुर्डे यांनी त्यांचे मो.क्र. 7276203137 वरुन लोकसेवक श्री सुनिल सातुसे यांचे मोबाईल क्र. 8390088073 यावर फोन केला असता लोकसेवक यांनी तक्रारदार यांना आज कार्यालयात येणार नसल्याचे सांगुन उदया येऊन भेटा असे सांगितले. त्यामुळे पुढील पडताळणी कारवाई हि दिंनाक 04/06/2026 रोजी करण्याचे ठरविण्यात आले. याबाबत सविस्तर पंचनामा करण्यात आला आहे.

दिंनाक 04/06/2026 रोजी पडताळणी कारवाईसाठी आम्ही व पंच साक्षीदार,सापळा पथक 11.00 वा.चे दरम्यान लाप्रवि कार्यालय पुणे येथे हजर झालो. तक्रारदार यांना फोनद्वारे अगवत करुन शासकीय वाहन महिंद्रा बोलेरो गाडी क्र. एम एच 33 सी 273 मधुन पडतळणी व सापळा कारवाईचे साहीत्यासह ला.प्र.वि.पुणे कार्यालय येथुन 11/42 वा. चे सुमारास रवाना झालो. जेल रोड मार्गे - मेंटल हॉस्पिटल रोडच्या पाठीमागील बाजुच्या रोडलगत 12/15 वा. पोहचलो. सदर ठिकाणी तक्रारदार हे त्यांचेकडील काळ्या रंगाच्या चेतक गाडी क्र. एम एच 14 एन.जी. 4646 सह हजर होते. त्यानंतर तक्रारदार, व पंचाचे लाच मागणी पडताळणी निवेदन ध्वनीमुद्रीत केले ती वेळ 12:23 वा. होती. त्यानंतर आम्ही तक्रारदार, पंच साक्षीदार व सापळा पथकास पडताळणी कारवाईच्या अनुषंगाने सुचना दिल्या.

त्यानंतर पोलीस शिपाई महामुलकर यांचे मदतीने तक्रारदार श्री बुर्डे यांना व्हॉईस रेकॉर्डर लावुन तो सुरु करुन पडताळणीसाठी पंच क्र.1 श्री. साहील प्रधान यांचेसह तक्रारदार यांचे दुचाकी एम एच 14 एन.जी 4646 यावरुन लोकसेवक सातुसे यांची भेट घेण्याकरीता तलाठी कार्यालय च-होली बु. या ठिकाणी रवाना केले. ती वेळ 12:31 वा. होती. आम्ही उर्वरित पडताळणी पथक व  पंच क्र.2 असे मेंटल हॉस्पिटलचे पाठीमगाील बाजुचे रोडलगत थांबून राहीलो. काही वेळाने तक्रारदार श्री. बुर्डे हे पंच क्रमाक 1 श्री. साहील प्रधान याचेसह सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी आले. त्यावेळी पो.शि. महामुलकर यांनी आमचे सांगणेवरून तक्रारदार यांना लावलेला व्हॉईस रेकॉर्डर बंद केला, ती वेळ 13:19 वा. ची होती. त्यानंतर पंच क्र.1 श्री प्रधान यांना आम्ही घडलेल्या हकीकतीबाबत विचारणा केली असता त्यांनी सांगितले की,  मी व तक्रारदार असे त्यांचे दुचाकीवरुन तलाठी कार्यालय च-होली बु. येथे गेलो त्यावेळी लोकसेवक श्री सातुसे कार्यालयात हजर होते. लोकसेवक श्री सातुसे व तक्रारदार श्री बुर्डे यांचेमध्ये वारसनोंदीबाबत चर्चा झाली.  तेव्हा तक्रारदार यांनी लोकसेवक श्री सातुसे यांना लाच रक्कमेबाबत विचारणा केली. सातुसे यांनी मागितलेल्या लाच रक्कमेबाबत काहीतरी कमी करा असे तक्रारदार बोलले असता श्री सातुसे तक्रारदार यांना "ते कसय..आता अजुन किती करणार मला सांगा...." असे म्हणाले. तसेच माझेबाबत तक्रारदार यांना विचारणा केली . तेव्हा तक्रारदार यांनी मी बिल्डरचा माणुस असुन तुम्ही मागितलेली रक्कम मी देणार असल्याचे सागितले. त्यानंतर तक्रारदार बुर्डे यांनी श्री सातुसे यांना "मग काय ऐशीच करायचे.. थोड फार अॅडजेस .. होय सर.." असे विचारले. त्यावर श्री सातुसे तक्रारदार यांना  "ह.." असे म्हणाले. तेव्हा तक्रारदार बुर्डे यांनी श्री सातुसे यांना "थोडी रिक्वेस्ट होती काल पण आलो होतो.." असे म्हणाले असता, श्री सातुसे यांनी तक्रारदार यांना आता गर्दी असुन संध्याकाळी चार वाजता येण्यास सांगितले. त्यामुळे तक्रारदार व आम्ही पुन्हा सापळा पथक थांबले ठिकाणी परत आलो." अशी हकिकत सांगितली. त्यानंतर आम्ही तक्रारदार श्री तेजस बुर्डे यांना घडलेल्या हकिकती बाबत विचारणा केली असता, त्यांनी सांगितले की, "मी व पंच क्र.1 श्री प्रधान असे लोकसेवक श्री सातुसे यांचे च-होली बु. येथील तलाठी कार्यालयामध्ये गेलो त्यावेळी लोकसेवक श्री सातुसे कार्यालयामध्ये हजर होते. त्यावेळी मी माझ्या वारसनोंदीबाबत बोलणी करुन सातुसे यांनी मागितलेल्या लाच रक्कमेबाबत काहीतरी कमी करा असे बोललो असता श्री सातुसे मला "ते कसय..आता अजुन किती करणार मला सांगा...." असे म्हणाले. तसेच माझ्यासोबत आलेल्या पंचांबाबत विचारणा केली . तेव्हा मी श्री सातुसे यांना बिल्डरचा माणुस असुन तुम्ही मागितलेली रक्कम हे देणार असल्याचे सागितले. त्यानंतर मी श्री सातुसे यांना "मग काय एेशीच करायचे.. थोड फार अॅडजेस .. होय सर.." असे म्हणालो. त्यावर श्री सातुसे मला "ह.." असे म्हणाले. तेव्हा मी श्री सातुसे यांना "थोडी रिक्वेस्ट होती काल पण आलो होतो.." असे म्हणालो. त्यावर श्री



Scanned with CamScanner

सातुसे मला संध्याकाळी चार वाजता येण्यास सांगितले. त्यानंतर मी व पंच पुन्हा माझे अॅक्टीव्हा गाडीवरुन सापळा पथकाजवळ आलो.

तक्रारदार तेजस बुर्डे व पंच क्र.1 यांनी सांगितलेप्रमाणे लोकसेवक श्री सातुसे व तक्रारदार श्री बुर्डे यांचेमध्ये त्यांचे प्रलंबीत कामाबाबत व लाचेबाबत चर्चा झाली परंतु लाच मागणी बाबत स्पष्टता झाली नाही. तसेच लोकसेवक श्री सातुसे यांनी तक्रारदार बुर्डे यांना चार वाजता पुन्हा कार्यालयामध्ये भेटण्याकरीता बोलविल्याने चार वाजता पुन्हा पडताळणी कारवाई करण्याचे ठरविण्यात आले. तसेच पुन्हा संशय येऊ नये म्हणुन पुढील पडताळणी कारवाई ही धाणोरी येथील पठारे मळा च-होली बुद्रुक या ठिकाणाहुन करण्याचे ठरविण्यात आले. परंतु पुढील कारवाई करीता चार तासाचा अवधी असल्याने व लोकांना संशय येऊ नये म्हणून सदर पडताळणी कारवाई नंतर सापळा पथक व पंच असे ला.प्र.वि.कार्यालय येथे परत आले. त्यानंतर आम्ही तक्रारदार यांना संपर्क करुन पंच साक्षीदार, सापळा पथक असे शासकीय वाहनाने ला.प्र.वि.कार्यालय येथुन 14/40 वाजता शासकीय वाहनातुन रवाना होऊन पठारे मळा च-होली बुद्रुक येथील मोकळ्या मैदानावर 15/20 वाजता पोहोचलो. त्याठिकाणी तक्रदार हे त्यांचे अॅक्टिवा दुचाकी क्र. एम एच 14 एन जी 4646 सह हजर होते.

लोकसेवक श्री सातुसे यांना भेटण्याकरीता व लाच मागणी पडताळणी करण्या करीता तक्रारदार श्री बुर्डे व पंच क्र. 1 श्री साहील प्रधान यांचेसह त्यांचे दुचाकी वरुन च-होली बुदुक तलाठी कार्यालय येथे पाठविण्याचे ठरविण्यात आले. त्यानंतर आम्ही 15:34 वा व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन तक्रारदार यांना पंच नं.1 यांचेसोबत तक्रारदार यांचे दुचाकी अॅक्टिवा दुचाकी क्र. एम एच 14 एन जी 4646 वरुन च-होली बुद्रुक तलाठी कार्यालय येथे रवाना केले. व आम्ही उर्वरित पडताळणी व पथक पंच क्र.2 पठारे मळा येथील मोकळ्या मैदानावर शासकीय वाहनामध्ये थांबून राहीलो.

काही वेळाने तक्रारदार श्री तेजस बुर्डे व पंच क्रमांक 1 श्री प्रधान हे आम्ही थांबलेल्या ठिकाणी परत आले. तेव्हा आमचे सुचनेवरुन पोशि महामुलकर यांनी तक्रारदार यांचेकडील व्हाईस रेकॉर्डर काढून घेवुन बंद करुन आमच्या ताब्यात दिला. त्यावेळी 16:11 वाजले होते. त्यानंतर आम्ही पंच क्र.1 श्री. साहील प्रधान यांना रवाना केल्यापासुन परत येईपर्यंत काय घडले याबाबत विचारणा केली असता, त्यांनी सांगीतले की, "मी व तक्रारदार असे त्यांचे दुचाकी वाहनावरुन तलाठी कार्यालय च-होली बु. येथे गेलो त्यावेळी लोकसेवक सातुसे हे कार्यालयात हजर होते. त्यावेळेस सातोसे यांनी माझ्या विषयी विचारणा केली असता तक्रारदार यांनी मला बिल्डरचा माणुस असल्याचे सांगुन वारस नांेदीचा खर्च मी देणार असल्याबाबत सांगितले. त्यावर लोकसेवक सातुसे यांनी माझा बिल्डर किंवा त्यांचे माणसांशी संबंध नाही असे बोलले. त्यावर तक्रारदार बुर्डे यांनी ठिक आहे असे बोलुन ऐका ना किती ऐंशी हजार दयायचे काहीतरी थोडेफार नाय होत, असे बोलुन लाच रक्कम कमी करण्यास सांगितले असता. लोकसेवक सातुसे हे कशाला भिजत गाण ठेवताय साहेब, असे तक्रारदार यांना बोलले. त्यानंतर खाजगी इसम नेमाजी हे तक्रारदार बुर्डे यांना, सर काय असल ते देऊन टाका.. देऊन टाका काय असल ते, असे तक्रारदार यांना बोलले. त्यानंतर तक्रारदार बुर्डे लाच रक्कम थोडी कमी करण्याबाबत बोलले असता, लोकसेवक सातोसे हे खाली आलो की पहिल्याच वेळी खाली आलो, असे बोलले. त्यावर तक्रारदार बुर्डेने सत्तर हजार मध्ये करुन टाका, असे बोलले असता लोकसेवक सातोसे यांनी मानेने होकार दिला तसेच लाच रक्कम ही खाजगी इसम नेमाजी यांचेकडे देण्यास सांगितली.

त्यानंतर आम्ही तक्रारदार श्री. बुर्डे यांच्याकडे पडताळणी कारवाई दरम्यान घडलेल्या हकिकतीबाबत विचारणा केली असता त्यांनी वरीलप्रमाणे हकीकत सांगितली. त्यानंतर आम्ही व्हाईस रेकॉर्डर मधील संभाषण फास्ट फॉरवर्ड करुन ऐकले असता वरील प्रमाणे ध्वनिमुद्रण ऐकु आले. त्यानंतर तक्रारदार यांना आम्ही नेमाजी कोण आहेत याबाबत विचारणा केली असता तक्रारदार यांनी आम्हास सांगितले की, नेमाजी हे खाजगी इसम असुन लोकांची ओळख असल्याने तलाठी ऑफीसमधे लोकांना व तलाठी यांना कामामध्ये मदत करतात, असे सांगितले.

एकंदरीत झालेल्या पडताळणी कारवाई दरम्यान तक्रारदार बुर्डे व लोकसेवक श्री सातुसे यांची समक्ष भेट होऊन त्यांचेमध्ये वारसनोंदीच्या कामाबाबत चर्चा झाली. त्यावेळी तक्रारदार यांना लोकसेवक श्री सातुसे यांनी त्यांचे वारसनोंद करण्याच्या कामाकरीता सत्तर हजार रुपये लाच मागणी केल्याचे निष्पन्न झाले तसेच लाच रक्कम सत्तर हजार रुपये ही त्यांचे कार्यालयातील खाजगी व्यक्ती नेमाजी यांचेकडे देण्याबाबत सांगितले आहे. परंतु तक्रारदार यांनी लोकसेवक सातुसे व खाजगी इसम नेमाजी हे आता कार्यालयाची वेळ संपल्याने कार्यालयात मिळुन येणार नाहीत, असे सांगितले. त्यामुळे पुढील सापळा पुर्व व सापळा कारवाई ही दिंनाक 05/06/2026 रोजी सकाळी 11/00 वा. नंतर करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले. सदर बाबत सविस्तर पंचनामा करण्यात आला आहे.

दिंनाक 05/06/2026 रोजी तक्रारदार बुर्डे यंानी माहिती घेतली असता, लोकसेवक सातुसे तसेच खाजगी व्यक्ती नेमाजी हे दोघेही कामानिमित्त बाहेर असल्याने कार्यालयात येणार नाही. तसेच शनिवारी आणि रविवारी



Scanned with CamScanner

कार्यालय बंद असल्याने लोकसेवक सातुसे तसेच खाजगी इसम नेमाजी हे सोमवारी दिनाक 08/06/2026 रोजी कार्यालयात येतील, असे तक्रारदार यांनी सांगितल्याने सापळा कारवाई ही दिनाक 08/06/2026 रोजीपर्यत तात्पुरती स्थगित करण्यात आली. दिनाक 08/06/2026 रोजी सकाळी 11:00 वाजता सापळा पथकास व पंचांना कार्यालयात हजर राहण्याबाबत सुचना देण्यात आली. तसेच सदर कारवाईबाबत गोपनीयता ठेवण्याची सुचना देण्यात आली.

त्यानंतर दिनाक 08/06/2026 रोजी सकाळी 11:00 वाजता आम्ही सापळा पथक व पंच यांचेसह कार्यालयात हजर असताना तक्रारदार यांनी दुपारी 13:15 वाजताचे सुमारास आम्हाला वॉट्सअॅप कॉल करुन लोकसेवक सातुसे व खाजगी इसम नेमाजी हे कार्यालयात येणार असल्याबाबत सांगितले. तसेच त्यावेळी भेटण्याचे ठिकाण हे वाघेश्वर महाराज क्रिडा संकुल समोरील मोकळी जागा, च-होली बुद्रुक, ता हवेली, जि पुणे हे ठरविण्यात आले. त्यानंतर आम्ही सापळा पथक व पंच यांचेसह शासकीय वाहन क्र एम एच 12 यु सी 4109 यांचेसह सापळापुर्व व सापळा कारवाई करता आवश्यक साहित्यासह 13:44 वाजता ला प्र वि कार्यालय,पुणे येथुन रवाना झालो व साधु वासवानी चौक, येरवडा मार्गे ताजने चौक, काटे चौक मार्गे वाघेश्वर महाराज क्रिडा संकुल समोरील मोकळी जागा, च-होली बुद्रुक, ता हवेली, जि पुणे येथे 14:28 वाजता पोहचलो. त्यावेळी तक्रारदार तेजस बुर्डे हे त्यांचे पांढ-या रंगाची अॅक्टीवा दुचाकी क्र एम एच 14 एन जी 4646 सह तेथे हजर होते. त्यानंतर तक्रारदार श्री तेजस बुर्डे व पंचांना सापळापुर्व तयारी करत असल्याचे सांगण्यात आले.

त्यानंतर आम्ही सापळा पथकातील चालक पो शि कदम यांचे मदतीने शासकिय वाहनामध्ये तक्रारदार तेजस बुर्डे व दोन्ही पंच यांना अॅन्थ्रासिन पावडरचे गुणधर्म समजावून सांगून त्याचे प्रात्यक्षिक करून दाखवुन सापळा कारवाईचे अनुषंगाने आवश्यक त्या सुचना तक्रारदार पंच क्र 1 व 2 तसेच सापळा पथकास दिल्या. याबाबत सविस्तर पंचनाम्यामध्ये नमुद करण्यात आले आहे. त्यानंतर आम्ही लाच रक्कम देणेकामी तक्रारदार तेजस बुर्डे यांना विचारणा केली असता त्यांनी त्यांचे बचतीमधुन 70,000/- रुपये सादर केले. आमचे सुचनेवरुन तक्रारदार यांनी हजर केलेल्या भारतीय चलनातील 500 रु. दराच्या 140 नोटांचे नंबर पोशि महामुलकर यांनी पो शि कुमकर यांचे मदतीने एका को-या कागदावर लिहुन घेतले. त्याचे सविस्तर वर्णन पंचनाम्यामध्ये नमुद आहे. लाच रक्कम रूपये 70,000/- (रूपये 500/- दराच्या 140 भारतीय चलनी नोटा) यांना पोशि /4337 चालक कदम यांनी अॅन्थ्रासीन पावडर लावली. तसेच पोशि.कदम यांनी सदर लाचेची रक्कम तक्रारदार बुर्डे यांनी घातलेल्या काळया रंगाच्या पँटच्या पुढील उजव्या खिशात ठेवली व आमचेसुचनेवरुन पोशि कदम यांनी स्वच्छ पाण्याने हात धुतले. त्यानंतर सापळापुर्व निवेदन घेण्याकरीता सापळा पथकाचे मदतीने व्हाईस रेकॉर्डर व व्हिडीओ रेकॉर्डर सुरू चालू केला. ती वेळ 14:41 वाजताची होती. त्यामध्ये प्रथम तक्रारदार तेजस बुर्डे त्यानंतर पंच क्र.01 श्री. प्रधान व पंच क्र.02 श्री देशपांडे यांचे निवेदन घेतले. त्यानंतर व्हाईस रेकॉर्डर व व्हिडीओ रेकॉर्डर बंद केला. त्यावेळी 14/47 वाजले होते.

त्यानंतर तक्रारदार चौधरी यांचे शर्टचे आतील बनियनला सापळा कारवाईसाठी व्हाईस रेकाॅडर लावुन तो चालु करून तक्रारदार व पंच क्र 1 प्रधान यांना त्यांचे वर नमुद दुचाकीवरुन तलाठी कार्यालय, च-होली बुद्रुक ता हवेली जि पुणे येथे पाठविण्यात आले. ती वेळ 15:00 वाजताची होती. त्यांचे पाठोपाठ आम्ही सापळा पथकासह शासकीय वाहनाने कोणसही संशय येणार नाही असे निघालो. त्यानंतर च-होली तलाठी कार्यालयाचे परिसरामध्ये विखरुन थांबलो. काही वेळाने तक्रारदार तेजस बुर्डे यांनी सापळा पथकाला त्याचे डोक्यावर टोपी घालुन लाच रक्कम स्वीकारलेचा पुर्वनियोजित इशारा केला, त्यावेळी आम्ही सापळा पथक व पंच क्र.2 देशपांडे असे च-होली तलाठी कार्यालयात गेलो. त्यावेळी पोशि महामुलकर यांनी तक्रारदार यांचेकडील व्हॉईस रेकॉर्डर काढुन बंद केला. ती वेळ 15:13 वाजताची होती. त्यानंतर आम्ही तक्रारदार श्री. बुर्डे यांना पंचासमक्ष लाच रक्कम कोणी स्वीकारली अशी विचारणा केली असता तक्रारदार यांनी सांगितले की, लोकसेवक सातुसे यांनी सदर लाच रक्कम ही खाजगी इसम नेमाजी याचेकडे देण्यास सांगितल्याने तक्रारदार यांनी ती उजव्या हाताने दिली व खाजगी इसम नेमाजी यांनी उजव्या हाताने स्वीकारल्याचे सांगितले. त्यानंतर आम्ही तक्रारदार यांना कार्यालयाचे बाहेर थांबण्यास सांगितले. त्यानंतर आम्ही लोकसेवक सातुसे व खाजगी इसम नेमाजी यांना आमची ओळख सांगुन त्यांचेविरुद्ध झालेल्या सापळा कारवाईची माहिती दिली. तसेच दोघांना त्यांचे नाव व पुर्ण पत्ता याबाबत विचारणा केली असता श्री सातुसे यांनी त्यांचे नाव सुनिल भिकाजी सातुसे, वय 44 वर्षे, पद- ग्राम महसुल अधिकारी सजा च-होली बुद्रुक तलाठी कार्यालय, रा. फ्लॅट न 1307, बी विंग, 13 रा मजला, आयट्रेंड लाईफ, वाकड, पुणे मुळ पत्ता- मु केंबळी, ता कागल, जि कोल्हापुर आणि खाजगी इसम नेमाजी यांनी त्यांचे नाव श्री. नेमाजी माधवराव भोकरे, वय 40 वर्षे, काम एजंट, रा. सर्वे न 550, माऊली निवास, काकडे सिटी, च-होली खुर्द रोड मुळ पत्ता - मु बेलसर पो लोणी ता अर्धापुर जि नादेंड असे सांगितले.



Scanned with CamScanner

त्यानंतर आम्ही पंच क्रमांक 1 श्री प्रधान यांना लोकसेवक सातुसे यांनी लाच रक्कम कोठे ठेवली यांबाबत विचारणा केली असता त्यांनी लोकसेवक सातुसे यांचे सांगणेवरुन खाजगी इसम नेमाजी यांनी रक्कम स्वीकारुन ती लोकसेवक सातुसे यांचे सांगणेवरुन शेजारच्या रेकॉर्डरुम मधील लाकडी कपाटामध्ये नेवुन ठेवली असे सांगितले. त्यावेळी आमचे सुचनेप्रमाणे पोशि कुमकर यांनी व्हिडीओ रेकॉर्डर सुरू करुन तलाठी कार्यालयात कृत्रीम अंधार केला तेव्हा आम्ही आमचे स्वत:चे व त्यानंतर सापळा पथकाचे व पंच 01 यांचे हाताची अल्ट्रा व्हायोलेट दिव्याचे प्रकाशामध्ये तपासणी केली असता कुठलीही चकाकी दिसुन आली नाही. त्यानंतर पंचासमक्ष आम्ही खाजगी इसम नेमाजी यांचे हाताची तपासणी केली असता त्यांचे उजव्या व डाव्या दोन्ही हाताचे बोटांचे पे-यांवर अॅथ्रॉसिन पावडरची निळसर चकाकी दिसुन आली. तसेच तलाठी कार्यालयातील रेकॉर्ड रुममधील लाकडी कपाटामध्ये ठेवलेल्या लाच रक्कमेची अल्ट्राव्हायोलेट दिव्याचे प्रकाशामध्ये तपासणी केली असता लाचरक्कमेवर व कपाटातील कप्प्यावर अँथ्रासिन पावडरची निळसर चकाकी दिसून आली. त्यानंतर आम्ही दिलेल्या सुचनेवरुन पंच क्र.2 देशपांडे यांनी लाच रक्कम ताब्यात घेवून सदर नोटांवरील नंबर व सापळापुर्व कारवाई दरम्यान नोटांचे नंबर लिहून दिलेला कागदावरील नंबरशी तपासून पाहिले असता तंतोतंत जुळून आले. पंच क्र.2 देशपांडे यांचे दोन्ही हाताची अल्ट्राव्हायोलेट दिव्याचे प्रकाशामध्ये तपासणी केली असता पंच क्र 2 श्री देशपांडे यांचे तळहातांवर तसेच बोटांचे पे-यावर अँथ्रासिन पावडरची निळसर चकाकी दिसून आली. त्यानंतर तक्रारदार श्री. बुर्डे यांना कार्यालयामध्ये बोलवुन त्यांची अल्ट्राव्हायोलेट दिव्याचे प्रकाशात तपासणी केली असता त्यांचे उजव्या हाताचे बोटांचे पे-यांना व परिधान केलेल्या पँटच्या पुढील बाजुचे उजव्या खिशाचे कडांना व आतमध्ये अॅन्थ्रासिन पावडरची निळसर चकाकी दिसून आली. सदर लाच रक्कम हस्तगत करतेवेळी वेळीच्या घटनेचे पोशि आ◌ि◌न कुमकर यांनी त्यांचेकडे दिलेल्या शासकीय व्हिडीओ कॅमे-यामध्ये◌े व्हिडीओ रेकॉर्डिंग केले आहे. त्यानंतर आम्ही पंच क्र 1 प्रधान य◌ाना सापळा कारवाईवेळी घडलेल्या हकिकतीबाबत विचारणा केली असता त्यांनी सांगीतले की, तक्रारदार बुर्डे व मी असे येथील तलाठी कार्यालय येथे गेलो त्यावेळी कार्यालयामध्ये लोकसेवक सुनिल सातुसे व खाजगी इसम नेमाजी हे हजर होते, त्यावेळी मी तक्रारदार बुर्डे यांचे मागेच उभा होतो त्यावेळी तक्रारदार बुर्डे यांनी सातुसे व नेमाजी ज्या रुममध्ये बसले होते तेथे गेले व लाच रक्कम लोकसेवक सातुसे यांचेसमोर धरली सत्तर हजार रुपये आणलेत मी असे सांगितले. त्यावर लोकसेवक सातुसे यांनी सत्तर येत का, असे विचारुन यांनी सदर रक्कम नेमाजीकडे देण्याकरीता खुणेने सांगितले, त्यानंतर तक्रारदार बुर्डे यांनी लाच रक्कम लोकसेवक सातुसे यांचेसमक्ष खाजगी इसम नेमाजी यांचेसमोर धरली....हे सत्तर हजारे, सातुसे साहेबांनी सांगितल्याप्रमाणे...फक्त टाकुण द्या, असे बोललो असता, खाजगी इसम नेमाजी त्यांनी ती उजव्या हाताने स्विकारली. त्यानंतर तक्रारदार बुर्डे हे बाहेर गेले. त्यावेळी मी आतमध्येच थांबुन सदर लाचरक्कम कोठे ठेवतात यावर लक्ष ठेवुन होतो. त्यानंतर सातुसे साहेबांचे सांगण्यावरुन नेमाजी यांनी सदर लाच रक्कम ही कार्यालयातील दुस-या रुममध्ये नेवुन ठेवली. त्यानंतर लोकसेवक सातुसे व नेमाजी हे बाहेर जावुन पुन्हा तक्रारदार बुर्डे यांचेसोबत बोलत होते. त्यावेळी बुर्डे य◌ानी लाचरक्कम स्वीकारलेबाबतचा डोक्यावर टोपी घालुन सापळा पथकास इशारा केला, अशी हकीकत पंच 1 प्रधान यांनी आम्हाला सांगितली. त्यानंतर आम्ही तक्रारदार बुर्डे यांना घडलेल्या हकिकतीबाबत विचारले, त्यावेळी त्यांनीसुध्दा पंच 1 यांचेप्रमाणेच हकिकत सांगितली. लोकसेवक श्री. सुनिल सातुसे यांचेवर झालेल्या सापळा कारवाईबाबत त्यांचे वरिष्ठ श्री. जयराज देशमुख, तहसीलदार, अप्पर पिंपरी चिंचवड तहसील कार्यालय यांना फोनद्वारे माहिती देण्यात आली आहे. सदरबाबत सविस्तर पंचनामा करण्यात आलेला आहे.

तरी दिंनाक 01/06/2026 रोजी तक्रारदार श्री. तेजस सोपान बुर्डे यांनी दिलेल्या तक्रारीवरुन दि. 04/06/2026 रोजी 15:34 ते 16:11 वा. चे दरम्यान आणि दि.08/06/2026 रोजीचे 15:00 ते 15:13 वा. चे दरम्यान करण्यात आलेल्या पडताळणी व सापळा कारवाईदरम्यान लोकसेवक श्री.सुनिल भिकाजी सातुसे, वय-44 वर्षे,पद-तलाठी, सजा- च-होली बुद्रुक, ता. हवेली, जि. पुणे, रा. फ्लॅट न 1307, बी विंग, 13 रा मजला, आयट्रेंड लाईफ, वाकड, पुणे मुळ पत्ता- मु केंबळी, ता कागल, जि कोल्हापुर य◌ानी तक्रारदार य◌ाचे आजोबांच्या वडीलोपार्जित जमिनीवर तक्रारदार यांचे वडीलांचे व त्य◌ाचे काकांचे वारसनोंद करण्याकरीता 1,80,000/- रु. लाचेची मागणी करुन तडजोडीअंती 70,000/- रुपयांची मागणी पंचासमक्ष करुन सदर रक्कम खाजगी इसम श्री. नेमाजी माधवराव भोकरे, वय 40 वर्षे, काम एज◌ंट, रा. सर्वे न 550, माऊली निवास, काकडे सिटी, च-होली खुर्द रोड मुळ पत्ता - मु बेलसर पोष्ट लोणी ता अर्धापुर जि नादेंड यांचेतर्फे स्वीकारली. म्हणुन माझी लोकसेवक श्री. सुनिल भिकाजी सातुसे, वय 44 वर्षे, पद- ग्राम महसुल अधिकारी सजा च-होली बुद्रुक तलाठी कार्यालय, रा. फ्लॅट न 1307, बी विंग, 13 रा मजला, आयट्रेंड लाईफ, वाकड, पुणे मुळ पत्ता- मु केंबळी, ता कागल, जि कोल्हापुर आणि खाजगी इसम नेमाजी यांनी त्यांचे नाव श्री. नेमाजी माधवराव भोकरे, वय 40 वर्षे, काम एज◌ंट, रा. सर्वे न 550, माऊली निवास, काकडे सिटी, च-होली खुर्द रोड मुळ पत्ता - मु बेलसर पो लोणी ता अर्धापुर जि नादेंड यांचेविरुद्ध



Scanned with CamScanner

भ्रष्टाचार प्रतिंबध अधिनियम कलम 7, 12 प्रमाणे कायदेशीर फिंयाद आहे.
माझा वरील जबाब संगणकावर मराठीत टंकलिखीत केला असून, तो माझे सांगणेप्रमाणे बरोबर व खरा आहे.
हा जबाब लिहुन दिला स.ता.म.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

Pramod Sadashiv Wagh(I (Inspector)) / PI **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

08/06/2026

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)



Scanned with CamScanner

ठाण अंमलदार
दिघी पो स्टे. पिंपरी चिंचवड

**Registered by (नोंदणी अधिकारी)**

**Signature of Officer in charge, Police Station**
**(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

**Name (नाव):** Pramod Sadashiv W
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):** PI

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):** 08/06/2018

15. **Date and time of dispatch to the court**
**(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**



Scanned with CamScanner

N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

**Attachment to item 7 of First Information Report** (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र)**: Physical features, deformities and other details of the ( If known / seen )**(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील))

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म तारीक/ वर्ष) | Build (बांधा) | Height (cms.) (उंची(सें. मी.)) | Complexion (रंग) | Identification Mark (s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |
| 2 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा / बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्याच्या खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)



Scanned with CamScanner